# प्रसिध्दी पत्रक

दिनांक ३०/०९/२०२६

| अ. क्र. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| १ | घटक | भंडारा |
| २ | तक्रारदार | मुळ तक्रारदार वय २६ वर्षे (पुरुष) |
| ३ | आरोपी लोकसेवक | १) श्री. रमेश संपतराव खाडे, वय ३८ वर्षे, पद:- सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, भंडारा, (वर्ग -२) जिल्हा- भंडारा, मुळ पत्ता रा. बावची, ता. वाळवा, जिल्हा- सांगली,<br>२) रवीकुमार बाबुराव आडे, वय ३८ वर्षे, पद पोलीस शिपाई, ब.न. १४२३ (वर्ग -३) पोलीस स्टेशन, भंडारा, जिल्हा भंडारा, ह.मु. मल्लेवार यांचे घरी भाडयाने नेहरु वार्ड मोहाडी,मुळ पत्ता रा. पेडगाव, तालुका, जिल्हा- हिंगोली, |
| ४ | तक्रार | प्रकरण अशा प्रकारे आहे की, तक्रारदार श्री. निखिल राजेपाल सव्वालाखे,यांचे विरुध्द पोलीस स्टेशन, भंडारा येथे महिंद्रा शोरुम बेला येथील वासनीक मॅडम यांनी दिलेल्या तक्रारीवरुन यातील आरोपी लोकसेवक १) श्री. रमेश संपतराव खाडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, भंडारा, २) श्री.रवीकुमार बाबुराव आडे, पद पोलीस शिपाई, पोलीस स्टेशन, भंडारा, जिल्हा भंडारा,यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरुध्द असलेल्या तक्रारीवर ''तुला जेल मध्ये जावे लागेले मोठी केस आहे, जेल मध्ये जायचे नसेल व केस लहान करावयाची असेल तर १०,०००/-रुपये लागतील तुझेवर छोटी केस करुन घेतो'' अशा प्रकारे तंबी देवून लाचेची मागणी केल्याची तक्रार दिनांक २४/०९/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे प्राप्त झाली होती. |
| ५ | तक्रारीची पडताळणी | दिनांक २४/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन, भंडारा येथे पडताळणी कार्यवाही करण्यात आली त्यात यातील आरोपी लोकसेवक २ रवी आडे यांनी तक्रारदार यास तक्रारी संबंधाने ''तेच ते कागद तेच ते करशील तर ते स्टाप करल'' म्हणजेच लाच रक्कम देशील तर केस स्टाप करल असे बोलून स्वत:चे माबाईल फोनवरुन आरोपी लोकसेवक क्रमांक १ श्री.रमेश संपतराव खाडे,यांचे मोबाईल फोनवर फोन करुन तक्रारदार यांचे केस, लाचरक्कम संबंधाने बोलणी केली तसेच तक्रारदार यांची सुध्दा बोलणी करुन देवून त्यांचे करिता १०,०००/-रुपयाचे लाचेची मागणी केली आहे.<br>तसेच यातील आरोपी लोकसेवक श्री.रमेश खाडे, यांनी तक्रारदार यांना ''ठिक आहे. झालय सगळ ठिक आहे'' असे बोलून तक्रारदार यांना त्याचे मोठी कार्यवाही होणार नाही या करिता आस्वस्थ केले. तसेच तक्रारकर्त्यानी व्याजाने १०,०००/-रुपये आनले असल्याचे सांगितलेवर ''ठिक आहे ठिक आहे'' असे बोलून लाचेच्या मागणीस प्रोत्साहन देवून ती लाच रक्कम आरोपी रवी आडे यांचे कडे देण्यास सांगितले आहे.<br>सदर कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. रवी आडे, यांनी पंच यांना रागात त्यांचे नाव तसेच आधार कार्ड बाबत विचारणा करुन आत मध्ये बोलावले असता यातील तक्रारदार आणि पंच असे घाबरल्याने ते तिथुन निघुन आल्याने यातील आरोपी लोकसेवक श्री. रवी आडे यांना कार्यवाही संबंधाने संशय आला . |
| ६ | सापळा कार्यवाही | दिनांक ३०/०९/२०२६ रोजी यातील आरोपी लोकसेवक यांचे विरुध्द सापळा कार्यवाही आयोजित करण्यात आली. पंरतु पडताळणी कार्यवाही दिनांक २४/०९/२०२६ रोजी पडताळणी पुर्ण झाल्यावर यातील आरोपी लोकसेवक श्री. आडे यांना कार्यवाही संबंधाने संशय आल्याने ते पोलीस स्टेशन, भंडारा येथे हजर आले नाहीत व तक्रारदार यांनी सापळा कार्यवाही दरम्यान दोन्ही आरोपी लोकसेवक यांना फोन केला असता आरोपी लोकसेवक क्रमांक १ यांनी फोन रिसीव्ह केला नाही आणि आरोपी लोकसेवक क्रमांक २ यांचा मोबाईल फोन बंद दाखवीत असल्याने सदर दोन्ही आरोपी यांना कार्यवाही संबंधाने संशय आल्याची खात्री झाल्याने दोन्ही आरोपी लोकसेवक यांचे विरुध्द पोलीस स्टेशन भंडारा जिल्हा भंडारा येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

कार्यालय पोलीस उपअधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, भंडारा — सत्यमेव जयते

| | | |
|---|---|---|
| ७ | गुन्हा रजि.नं/ कलम/ पोलीस ठाणे | पोलीस स्टेशन भंडारा, जिल्हा- भंडारा येथे दोन्ही पुरुष आरोपी विरुध्द अप. क्रमांक २०३९/२०२६ कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ अन्वये वेळ १८:२१ वाजता गुन्हा नोंद. |
| ८ | आरोपी अटक दिनांक व वेळ | यातील दोन्ही आरोपी लोकसेवक यांना कार्यवाही संबंधाने संशय आल्याने ते फरार आहेत त्याचा शोध सुरु आहे. |
| ९ | सापळा अधिकारी | श्री. प्रविणकुमार पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा. मो.क्र. ७०२०२१२०९२ |
| १० | पर्यवेक्षण अधिकारी | श्री. प्रविणकुमार पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा. मो.क्र.७०२०२१२०९२ |
| ११ | सापळा पथक | पोलीस उपअधीक्षक, प्रविणकुमार पाटील, पोलीस हवालदार मिथुन चांदेवार, अतुल मेश्राम, पोलीस अंमलदार, विष्णू वरठी, सुमेध रामटेके, |
| १२ | मार्गदर्शक | १) श्री. दिगबंर प्रधान, पोलीस अधीक्षक लाप्रवि नागपूर<br>२)श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर<br>३)श्रीमती माधुरी बावीसकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर |

१३. लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारा विषयी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका विरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्या प्रमाण संपर्क साधावा.

| | घटक कार्यालय | परिक्षेत्र कार्यालय | लाप्रवि मुख्यालय |
|---|---|---|---|
| पत्ता | कार्यालय पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिव्हील लाईन, भंडारा, जिल्हा- भंडारा. | पोलीस अधीक्षक लाप्रवि नागपूर -२ रा माळा प्रशासकीय ईमारत क्र.१ सिव्हील लाईन नागपूर | सरपोचखानवाला मार्ग, वरळी मंबई- ४०००३० |
| दुरध्वनी कमांक / व्हाट्स ॲप कमांक | 07 184-252661<br>8432261064<br>1064 | 0712-2561520<br>9067671064<br>1064 | 022-24921212<br>1064 |
| ईमेल आयडी | dyspacbbhandara@mahapolice.gov.in | spacbnagpur@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

(प्रविणकुमार पाटील)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा